Comprehension

आकलनक्षमता

पूर्व परीक्षा पेपर : II

PRITHVI®
academy

Comprehension
आकलनक्षमता

© **पृथ्वी पब्लिकेशन**

आवृत्ती
जानेवारी, २०२०

प्रकाशक
'पृथ्वी पब्लिकेशन', १५३६,
सदाशिव पेठ, पुणे. ४११०३०
फोन : ०२० – २४४५१९८६

मुखपृष्ठ मांडणी
रसिका सागवेकर

मांडणी
रूपाली तांबे
अपूर्वा शिंदे
भाग्यश्री घुणकीकर

मुद्रितशोधन
प्रज्ञा भोसले

वितरण व्यवस्था
मो. नं. : ८३९०५५४१६१

अभिप्राय, सूचना व मागणीसाठी संपर्क
मो. नं. : ८३९०५५४१६१
publication@prithvi.net.in

मूल्य
₹ १६०/–

PRITHVI®
academy

या पुस्तकातील मजकुराचे कायदेशीर हक्क कॉपीराईट कायद्यानुसार प्रकाशकाकडे आहेत. या मजकुराचे कोणत्याही स्वरूपात पुनर्मुद्रण करण्यासाठी प्रकाशकाची परवानगी आवश्यक आहे. सदर बाबीचे उल्लंघन झाल्यास कॉपीराईट कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

या पुस्तकातील मजकूर व माहिती विविध स्त्रोतांमधून घेण्यात आली आहे. हा मजकूर व माहिती जास्तीत जास्त अचूक ठेवण्याचा प्रयत्न प्रकाशकाने केला आहे. तरीदेखील त्यामध्ये कालसापेक्ष व स्थलसापेक्ष बदल होऊ शकतात. या पुस्तकातील मजकूर व माहिती यामुळे होणाऱ्या नुकसानीस प्रकाशक जबाबदार राहणार नाहीत.

अनुक्रमणिका

1.	संच – 1	6
	उत्तरे	23
2.	संच – 2	24
	उत्तरे	42
3.	संच – 3	43
	उत्तरे	61
4.	संच – 4	62
	उत्तरे	79
5.	संच – 5	80
	उत्तरे	98
6.	संच – 6	99
	उत्तरे	117
7.	संच – 7	118
	उत्तरे	136
8.	संच – 8	137
	उत्तरे	155
9.	संच – 9	156
	उत्तरे	175
10.	संच – 10	176
	उत्तरे	194

संच – 1

खाली दिलेले परिच्छेद वाचा आणि प्रत्येक परिच्छेदावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे नमूद करा. या प्रश्नांची उत्तरे परिच्छेदावर आधारित असली पाहिजेत.

पुढील उतारा वाचून त्यावर आधारित 1 ते 5 प्रश्नांची उत्तरे द्या.

जनुकात काही दोष असेल आणि त्यामुळे आनुवंशिक गुणधर्म सदोष असतील, तर जनुकात बदल घडवून आणून हे दोष नाहीसे करता येतील का या दिशेने प्रयत्न सुरू झाले. जनुकीय अभियांत्रिकी असे नाव धारण केलेल्या या तंत्रात जनुकांच्या कृत्तकीकरण क्रियेस फार महत्त्वाचे स्थान आहे. कृत्तकीकरणाने समरूप जीव निर्माण करता येतात. मानवात नैसर्गिकरीत्या निर्माण होणारे असे समरूप जीव हे जुळे म्हणून ओळखले जातात. इतर प्राण्यांतही हे आढळतात किंवा प्रयोगशाळेत निर्माण करता येतात. जे. बी. गर्डन यांनी 1961 साली बेडकांचे समरूप भैकेर (अंड्यातून बाहेर पडणारे डिंभ) निर्माण केले.

जनुक कृत्तकीकरणात सूक्ष्मजंतूच्या कोशिकेत बाहेरचा जनुक घातला जातो व सूक्ष्मजंतूच्या विभाजनाबरोबर या जनुकाचेही विभाजन होते. जनुक डीएनए रेणूचा बनलेला असल्यामुळे त्यात प्रथिने बनविण्याचे संकेत असतात. या संकेतानुरूप ही जनुके प्रथिने बनवितात. जर जनुकात फरक केला, तरच त्यापासून निर्माण होणाऱ्या प्रथिनात फरक पडतो. हे जनुक सूक्ष्मजंतूत घालण्याकरिता पुनःसंयोगित डीएनए तयार करावे लागते आणि त्यासाठी प्रथम डीएनए रेणूचा तुकडा पाडणे आवश्यक असते. ज्या एन्झाइम्सच्या मदतीने हे तुकडे पाडले जातात त्यांना रेस्ट्रिक्शन एंडोन्युक्लिएज असे म्हणतात. असे एंझाइम सूक्ष्मजंतूत आढळते. डीएनए रेणू एका विशिष्ट क्षारकांच्या जोडीमध्ये कापण्याचे कार्य हे एंझाइम करते. उदा. एक प्रकारचे रिस्ट्रिक्शन एंडोन्युक्लिएज असे आहे की, ते GAATTC हा क्षारकांचा क्रम ओळखते व जेथे हा क्रम आढळेल तेथे G आणि A या दोन क्षारकांमध्ये रेणू कापते. हे एंझाइम म्हणजे एक प्रकारची कात्रीच होय. या कात्रीचा उपयोग करून पॉल बर्ग व त्यांच्या सहकाऱ्यांनी एसव्ही 40 या व्हायरसचा डीएनए रेणू कापला आणि तो सूक्ष्मजंतूंच्या लँब्डा या व्हायरसाशी जोडला. दोन भिन्न प्राण्यांच्या डीएनएचे रेणू जोडण्याचे हे कार्य प्रथमच वर्ग यांनी केले व या कार्याबद्दल त्यांना 1980 सालचे नोबेल पारितोषिक मिळाले.

यानंतर पुढील क्रिया म्हणजे हा पुनःसंयोगित रेणू असलेला व्हायरस मानवाच्या आतड्यातील इ. कोलाय या सूक्ष्मजंतूच्या कोशिकेत घालणे ही होय; पण हे होण्यापूर्वी रॉबर्ट पॉलक यांनी या संशोधनास हरकत घेतली. त्यांच्या मते नैसर्गिक व्हायरसमध्ये जर कृत्रिम फरक केले व असे व्हायरस असणारे सूक्ष्मजंतू जर मानवी शरीरात शिरले, तर त्याचे विपरीत परिणाम होण्याचा संभव आहे म्हणून 1974 साली या संशोधनावर निर्बंध घालण्यात आले. यथाकाल हे निर्बंध शिथिल करण्यात आले. पुनःसंयोगित करण्याकरिता डीएनएचे रेणू निरनिराळ्या प्रकारांनी मिळवले जातात. यांपैकी पहिल्या प्रकारात इतर प्राण्यांच्या डीएनए रेणूतून रेस्ट्रिक्शन एंडोन्युक्लिएजच्या साहाय्याने तुकडा काढून घेतात, दुसऱ्या प्रकारात स्वीकारी आरएनएच्या साच्यावरून रिव्हर्स ट्रान्सक्रिप्टेज या एंझाइमच्या साहाय्याने डीएनएचे संश्लेषण करतात व तिसऱ्या प्रकारात रासायनिक पद्धतीने डीएनएचे संश्लेषण करतात.

प्र.1. डॉ. पॉलक यांनी पुनःसंयोगित रेणू तंत्रज्ञानाच्या संशोधनाला विरोध का दर्शविला ?

अ) कारण हे संशोधन मानवी नैतिकतेच्या विरुद्ध होते.

ब) डॉ. पॉलक यांनी पूर्वीच केलेल्या या संशोधनाचे श्रेय मात्र इतर संशोधकांना मिळाले होते.

क) नैसर्गिक व्हायरसमध्ये कृत्रिम बदल केलेले व्हायरस निसर्गास घातक सिद्ध होतील.

ड)मानवी शरीरावर वाईट परिणाम घडविण्याला हे कृत्रिम बदल केलेले नैसर्गिक व्हायरस कारणीभूत ठरू शकतात.

1)अ, ब आणि ड 2) फक्त क 3) क आणि ड 4) फक्त ड

प्र.2. प्रस्तुत उताऱ्यास खालीलपैकी कोणते शीर्षक योग्य ठरेल ?

1) जनुकीय कृत्तकीकरण 2) जनुकीय अभियांत्रिकी

3) पुनःसंयोगित डीएनए 4) डॉ. जे. बी. गर्डन यांचे जनुकीय संशोधन

प्र.3. जनुक कृत्तकीकरण या प्रक्रियेसंदर्भात खालील विधाने विचारात घ्या.

अ) पुनःसंयोगित डीएनएचा वापर केल्याशिवाय देखील जनुक कृत्तकीकरण ही प्रक्रिया पार पाडता येते.

ब) रेस्ट्रिक्शन एंडोन्युक्लिएजच्या साहाय्याने जनुक डीएनए प्रथिने बनविण्याचे संकेत देतात.

क) प्रथिनांमध्ये बदल होण्याचे कारण जनुकांमध्ये बदल करणे हेच असते.

वरीलपैकी कोणती विधाने असत्य आहेत ?

1) अ आणि ब 2) फक्त ब 3) ब आणि क 4) वरीलपैकी सर्व

प्र.4. रेस्ट्रिक्शन एंडोन्युक्लिएज या एंझाइमची जनुकीय कृत्तकीकरणातील पुढीलपैकी भूमिका कोणती ?

अ) पुनःसंयोगित डीएनए तयार करणे.

ब) डीएनए रेणूचे विभाजन करणे.

क) डीएनएचे रेणू एकमेकांस जोडणे.

1) अ आणि ब 2) फक्त अ 3) फक्त ब 4) ब आणि क

प्र.5. पुनःसंयोगित करण्याच्या दृष्टीने डीएनएचे रेणू खालीलपैकी कोणकोणत्या पद्धतींद्वारे प्राप्त केले जातात ?

1) रेस्ट्रिक्शन एंडोन्युक्लिएज किंवा रिव्हर्स ट्रान्सक्रिप्टेजच्या साहाय्याने डीएनएचे संश्लेषण करणे.

2) रेस्ट्रिक्शन एंडोन्युक्लिएज किंवा रिव्हर्स ट्रान्सक्रिप्टेजच्या साहाय्याने डीएनएचे तुकडे पाडणे.

3) रिव्हर्स ट्रान्सक्रिप्टेजच्या साहाय्याने डीएनएचा संयोग घडवून आणणे.

3) विविध रासायनिक पद्धतींनी डीएनएचे तुकडे पाडणे.

पुढील उतारा वाचून त्यावर आधारित 6 ते 10 प्रश्नांची उत्तरे द्या.

मुक्तिबोधांच्या मते शून्यवादी परंपरेतील लोकांनी सद्यःस्थितीची केलेली एकूण चिकित्सा मुळापासून चुकलेली आहे. त्यांच्या या चिकित्सेला जर ऐतिहासिकतेचे परिमाण मिळाले असते, तर त्यांच्याकडून अशी गंभीर चूक झाली नसती. आर्थिक-सामाजिक इतिहासाच्या दृष्टीने पाहिले तर असे लक्षात येते की केशवसुत व मर्ढेकर हे दोघे एकाच युगाच्या दोन वेगळ्या टोकांच्या कालखंडांचे प्रतिनिधी आहेत. ''मर्ढेकरांची सहानुभूती थोर होती. ते निराशावादी कवी असले तरी केशवशसुतांइतकेच मानवनिष्ठ होते. केशवसुत आशावादी-मानवतावादी तर मर्ढेकर निराश - मानवतावादी. एकीकडे मानवी व्यक्तित्वाच्या सामर्थ्यांबद्दल पूर्ण आशा व अभिमान तर दुसरीकडे त्याबद्दलची संपूर्ण निराशा व (क्वचित तुच्छतामूलक) अनुकंपेचा भाव. सरंजामी संबंध व जीवनकल्पना नष्ट करून वर येणाऱ्या मध्यमवर्गीय व्यक्तिवादाचा क्रांतिकारक उत्कर्ष एकीकडे, तर दुसरीकडे कुचंबलेल्या मध्यमवर्गातील एकाकी व्यक्तींची

संबंध– विच्छेदाची वेदना. केशवसुतांना दिव्य भविष्यांचे दृश्य दिसत होते, तर मर्ढेकरांच्या डोळ्यांच्या भिंती झालेल्या होत्या.'' .... ''मर्ढेकरांच्या तुच्छतावृत्तीच्या मागे एक वास्तवदर्शी, उदास झालेलें, गंभीर व अगतिक व्यक्तित्व उभें होते, एक माणूस उभा होता. आज जीवनसंदर्भात जगणारा माणूसच निघून गेलेला आहे व नवकाव्याने वेगळीच वाट धरली आहे.'' (नवी मळवाट, दु. आ, प्रास्ताविक, पृ. दहा– अकरा.) 1949 मध्ये लिहिलेल्या नवी मळवाटच्या पहिल्या प्रस्तावनेत मुक्तिबोध म्हणतात, ''जागतिक भांडवलशाहीच्या ऱ्हासकालामुळे देशी भांडवलशाही उपजतच प्रतिगामी निपजली. दडपणुकींचे कार्य जन्मतःच तिला करावे लागले. या व्यवस्थेच्या समर्थनार्थ आर्थिक, तात्त्विक आणि नैतिक क्षेत्रांतही तिची धडपड चालू आहे. या वर्गावर बांडगुळाप्रमाणे जगणारा आणि तिच्या मर्यादांत वास्तविक जीवनात वागणारा असा कलावंतांचाही एक वर्ग आहे. कलावंत असल्यामुळे चारही बाजूंस (त्याच वर्गात) चालणारी दांभिकता, अनीति, अज्ञान, संस्कृतीचा नाश, लैंगिक स्वैराचार या गोष्टी त्याच्या मनांत किळस उत्पन्न करतात. मुस्कटदाबीमुळे बिथरलेल्या पण व्यवहार न सोडण्याइतका सुज्ञपणा असणाऱ्या या कलावंतास सारें जग किळसवाणें वाटणें साहजिक आहे. परंतु एका मृतप्राय वर्गातील कीड ही साऱ्या मानवजातीचा गुणविशेष समजून साऱ्या उच्च मूल्यांचा उपहास करावयाची प्रवृत्ती चुकीची नाही असें कोण म्हणेल? मानवाची प्रगति झाली नाही, यंत्राचा माणूस दास झाला आहे, यांतून सुटकेची आशा नाही, अशी ही अबुद्धिवादी विचारसरणी आहे. खरें म्हणजे जड यंत्रांनी माणसाला दास केलें नसून यंत्रांच्या मालकांनी समाजास आपला दास बनविलें आहे. यंत्राची वैयक्तिक मालकी जाऊन सामुदायिक मालकी असल्यास ही दैन्यावस्था यावयाचें कारण नाही. तेव्हा आजच्या हीन समाजजीवनाच्या रोगांचे हें मूळ कारण न बघतां त्याचें कारण माणसाच्या मूलप्रवृत्तीच हीन आहेत असें समजणें हें या विचारप्रणालींचे असामाजिक, माणुसकीस कमीपणा आणणारें असें वैगुण्य आहे. या भूमिकेवरून (कित्येकदा फक्त मानवीय) अशा सामाजिक दंभांवर उपहासात्मक वृत्तीने कला निर्माण करणारा हा दुसरा प्रवाह आहे. ह्या प्रवृत्तीचें प्रकट रूप तुच्छतावादी असें आहे...''(कित्ता, पृ. 100–101.)

प्र.6. मर्ढेकरांची कोणती वैशिष्ट्ये अधोरेखित केलेली दिसून येतात?

अ) आशादायी काव्यात्म सूर **ब) मानवतावादी दृष्टिकोन**

क) मध्यमवर्गीय वेदनेस वाट

1) केवळ ब 2) ब व क 3) सर्व 4) अ व क

प्र.7. 'यंत्राच्या मालकांनी समाजास आपला दास बनवले आहे,' असे मुक्तिबोधांनी का म्हटले आहे?

1) मानवजातीच्या उच्च मूल्यांचा उपहास झाला आहे.

2) मालकी सामूहिक नसून ती एककेंद्री आहे.

3) भांडवलशाहीत दोष आहेत.

4) कामगारांचे अतोनात शोषण पाहिल्यामुळे, तसे म्हटले आहे.

प्र.8. सामाजिक दंभांवर उपहासात्मक वृत्तीने कलानिर्मिती करणाऱ्यांविषयी मुक्तिबोधांना काय वाटते?

अ) ते मूलगामी विचार करीत नाहीत.

ब) ते मनुष्याच्या मूळप्रवृत्तींवर फुली मारत नाहीत.

क) त्या प्रवृत्तीचे मूळरूप तुच्छतावादी आहे.

1) केवळ अ बरोबर 2) अ व ब बरोबर 3) सर्व बरोबर 4) अ व क बरोबर

प्र.9. पुढील विधाने वाचा.

अ) केशवसुत व मर्ढेकर हे दोन वेगळ्या काळांचे ; पण एकाच विचारपरंपरेचे प्रतिनिधी आहेत.

ब) मुक्तिबोधांनी देशी भांडवलशाहीचे काही अंशी समर्थन केले आहे.

1) अ बरोबर ब चूक 2) दोन्ही बरोबर 3) ब बरोबर अ चूक 4) दोन्ही चूक

प्र.10.प्रस्तावनेतून कलावंतांच्या एका वर्गाचा 'समाचार' घेतला आहे, कारण:

1) ते देशी भांडवलदार व शोषक परंपरेचे समर्थक होते म्हणून

2) आयत्या पिठावर रेघोटे ओढून त्यांच्या मर्यादा स्वीकारल्यामुळे

3) निराशावादी, अवास्तवदर्शी मांडणीमुळे

4) वरील सर्व कारणांमुळे

पुढील उतारा वाचून त्यावर आधारित 11 ते 15 प्रश्नांची उत्तरे द्या.

राष्ट्राराष्ट्रांच्या हितात संघर्ष अटळ नाही, सर्व मानव बांधव होत व संगरापेक्षा सहकार्यानेच मानवी प्रगती साधेल, हे पटवून देऊन विश्वबंधुत्वाची भावना निर्माण करणारे शिक्षण म्हणजे आंतरराष्ट्रीय सामंजस्याचे शिक्षण होय. दोन महायुद्धांनी लष्करी संघर्षामुळे होणारे अनिष्ट परिणाम प्रत्ययास आले. तिसरे महायुद्ध झाले तर मानवी संस्कृती नष्ट होईल, अशी भीती विचारवंतांना वाटत आहे. युद्धांचा उगम भावनेत असतो, म्हणून द्वेषभावना थोपवून धरून सदिच्छेचे बीजारोपण करणाऱ्या शिक्षणाची आवश्यकता निर्माण झाली आहे.

मूलत: सर्व मानवजात एकरूप आहे. भिन्न देशांत अन्न, वस्त्र, चालीरिती इ. बाबतींत भेद दिसत असले, तरी सर्वत्र मानवाच्या आशाआकांक्षा, गुणदोष, सुखदु:खे समान आहेत. सर्वत्र मानव पूर्णतेसाठी झटत आला आहे व या प्रयत्नांचा परिपाक म्हणजे आजची उन्नत मानवी संस्कृती होय. या संस्कृतीचे जतन करणे सर्व मानवांचे कर्तव्य आहे. युद्धांनी भांडणे मिटत नाहीत, हानी मात्र होते. क्षयादी रोग, धरणीकंपादी उत्पात, अज्ञान व अंधश्रद्धा हे सर्व मानवजातीचे शत्रू असून त्यांना तोंड देण्यासाठी सहकार्याची अभेद्य फळी निर्माण करणे श्रेयस्कर आहे. विश्वबंधुत्वाची कल्पना सर्व धर्मांच्या तत्त्वप्रणालीत अंतर्भूत असली, तरी ही भावना रुजविण्याचे महत्त्व पहिल्या महायुद्धानंतर जाणवू लागले. त्यासाठी राष्ट्रसंघाची स्थापना झाली व राष्ट्रांतील तंटे समजुतीने सोडविण्याचे तत्त्व मान्य करण्यात आले. यासाठी खासगी प्रयत्नही झाले; 1924 साली विश्वभारती विद्यापीठाची स्थापना करून रवींद्रनाथ टागोर यांनी आंतरराष्ट्रीय सामंजस्याच्या शिक्षणास जोराची चालना दिली. हे प्रयत्न निष्फळ झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी सामंजस्याची आवश्यकता अधिकच तीव्रपणे भासू लागली. या तीव्र जाणिवेतून संयुक्त राष्ट्रे ही संघटना निर्माण झाली. तिचे मुख्य उद्दिष्ट मानवी समतेवर आधारलेले स्नेहसंबंध सर्व राष्ट्रांत निर्माण करणे हे आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवर सामंजस्याचे शिक्षण देण्याचे कार्य संयुक्त राष्ट्रांची एक प्रमुख शाखा युनेस्को करीत आहे. युनेस्कोच्या प्रेरणेने सभासदराष्ट्रे परराष्ट्रांतील अध्यापक व विद्यार्थी यांना शिष्यवृत्त्या व प्रवासवृत्त्या देतात. अशा रीतीने भिन्नदेशीय अध्यापकांचा व विद्यार्थ्यांचा परिचय होऊन परकीय जीवनाचे व संस्कृतीचे प्रत्यक्ष दर्शन घडते. तसेच युनेस्कोच्या प्रेरणेने विविध राष्ट्रे आपली सांस्कृतिक शिष्टमंडळे व कलापथके परदेशात पाठवितात व त्यांच्याद्वारा लोकांना मानवी संस्कृतीच्या विविधतेतील एकात्मतेचा प्रत्यय येतो. युनेस्कोशी सहकार्य करणारी भारतीय राष्ट्रीय आयोग ही सरकारी यंत्रणा दिल्लीत आहे. प्रशिक्षण-विद्यालये व माध्यमिक शाळा यांतून सामंजस्याचे शिक्षण देण्याचे कार्य ही यंत्रणा करते. या कार्याचे स्वरूप शिक्षकांसाठी सत्रे भरवणे व शाळांमधून प्रकल्प तयार करून घेणे असे असते.

अशा स्वरूपाचे कार्य राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण मंडळाच्या विस्तार सेवा विभागामार्फतही चालते. माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी जो अभ्यासक्रम आखलेला आहे, त्यात आंतरराष्ट्रीय सामंजस्याचे शिक्षण हा विषय समाविष्ट करण्यात आला आहे.

प्र.11. महायुद्धांची मालिका थांबविण्यासाठी लेखकाने कोणते उपाय सुचवले आहेत ?

अ) राष्ट्राराष्ट्रांमधील असूयेची भावना संपुष्टात आणण्याच्या दृष्टीने आवश्यक पावले उचलणे.

ब) एकमेकांबद्दल द्वेषाची भावना बाळगून असणाऱ्या शेजारी राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणात आवश्यक सुधारणा करणे.

क) राष्ट्राराष्ट्रांतील परस्परविरोध हा अटळ असल्यामुळे महायुद्धांची मालिका थांबवणे दुर्घट आहे.

1) फक्त अ 2) फक्त क 3) अ आणि ब 4) यापैकी नाही.

प्र.12. लेखकाच्या मते युद्धांचे कोणकोणते परिणाम असू शकतात ?

अ) समाजात अंधश्रद्धा पसरते.

ब) भूकंपांसारख्या आपत्ती उद्‌भवतात.

क) रोगराई पसरते.

ड) युद्धांमुळे राष्ट्रांची मोठ्या प्रमाणात हानी होऊन त्यांच्यातील संघर्ष अखेर संपुष्टात येतो.

1) अ, ब आणि क 2) फक्त ड 3) अ, ब, क आणि ड 4) यापैकी नाही.

प्र.13. महायुद्धांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्राराष्ट्रांमध्ये मैत्री निर्माण करण्यासाठी झालेल्या प्रयत्नांबद्दल खालील विधाने विचारात घ्या.

अ) रवींद्रनाथ टागोर यांनी 1942 साली विश्वभारती विद्यापीठाची स्थापना केली.

ब) राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली तसेच विविध देशांमध्ये शासकीय पातळीवरच तत्सम प्रयत्न करण्यात आले.

क) लोकांमध्ये समता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने द्वितीय महायुद्धाचे बिगुल वाजताच संयुक्त राष्ट्रे या संघटनेची निर्मिती करण्यात आली.

वरीलपैकी अयोग्य विधाने ओळखा.

1) अ आणि ब 2) ब आणि क 3) फक्त अ 4) वरील सर्व

प्र.14. आंतरराष्ट्रीय सामंजस्याच्या शिक्षणाबद्दल कोणते ठळक मुद्दे उताऱ्यातून दिसून येतात ?

अ) आंतरराष्ट्रीय सामंजस्याच्या शिक्षणासाठी जगात सर्वप्रथम रवींद्रनाथ टागोर यांनी प्रयत्न केले.

ब) पृथ्वीतलावर माणसाची प्रगती साधायची असल्यास माणसामाणसात सहकार्य वाढीस लावण्याचे तत्त्व आंतरराष्ट्रीय सामंजस्याच्या शिक्षणात सांगितले आहे.

क) आंतरराष्ट्रीय सामंजस्याच्या शिक्षणाची वाटचाल पश्चिमेकडून पूर्वेकडे होत आली.

1) अ आणि ब 2) केवळ ब 3) ब आणि क 4) केवळ क

प्र.15. युनेस्कोच्या स्फूर्तीने विविध देश आपापली कलापथके कोणत्या उद्देशाने परदेशात पाठवितात?

1) तेथील पर्यावरणीय भूगोल समजावून घेण्यासाठी 2) पर्यटनाला चालना देण्यासाठी

3) विविध देशांमधील संस्कृती समजून घेण्यासाठी 4) वरील सर्व

पुढील उतारा वाचून त्यावर आधारित 16 ते 20 प्रश्नांची उत्तरे द्या.

पण दर्जेदार शिक्षण म्हणजे नेमके काय? इथेही आपल्याला त्यांचे परस्परविरोधी शक्तींची ओढाताण आढळून येते. एका बाजूच्या मते, दर्जेदार शिक्षण म्हणजे पूर्णपणे अभिजनवादी आशय आणि प्रकृतिधर्म असणारे शिक्षण. याचा अर्थ खासगी शाळांमधले इंग्रजी माध्यमातून मिळणारे शिक्षण. इथे इंग्रजीकडे विज्ञान- तंत्रज्ञानाची भाषा म्हणून पाहिले जाते आणि म्हणूनच तिचा संबंध आधुनिकतेशी जोडला जातो. अशा प्रकारचा अन्वयार्थ बाजारपेठेच्या दबावातून आलेला असतो आणि अशा अन्वयार्थाचा सरकार राबवत असलेल्या आर्थिक साम्राज्याशी मेळ बसतो. एक थोडीशी वेगळी भूमिका अशी आहे ज्यात आधुनिक शिक्षणपद्धतीची जागा पारंपरिक 'गुरुकुल परंपरे'सारख्या पद्धतीने घ्यावी असे सूचित केलेले आहे. या दोन्ही भूमिकांच्या मागे 'दर्जा म्हणजे अभिजनवादी व्यवहार आणि संस्कृती' असे मानणारा समान दृष्टीकोन आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यांच्यामध्ये फक्त 'अभिजनवर्ग म्हणजे कोणता हे कसे ठरवायचे' ('आधुनिकते'वरून ठरणारा की पारंपरिक अर्थाने) एवढाच काय तो फरक आहे. या दोन्ही भूमिका, अभिजनवादी शिक्षणपद्धती समाजाच्या व्यापक घटकांपर्यंत पोहोचवू पाहणाऱ्या परंपरावादी प्रवाहाच्या चौकटीत चपखल बसतात.

दर्जात्मक शिक्षणाचा दुसरा अन्वयार्थ जगातल्या वेगवेगळ्या भागांमधल्या प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे अनुभव लक्षात घेऊन लावला जातो. या अनुभवांमधून दोन मुद्दे पुढे येतातः एक म्हणजे, प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण नेहमीच सरकारी शाळांच्या माध्यमातूनच साध्य झालेले आहे, खासगी संस्थांमार्फत नव्हे आणि दुसरे म्हणजे, अभिजनवादी शिक्षण-व्यवस्था आणि सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण यांच्यामध्ये गुणात्मक फरक आहे. सार्वत्रिक शिक्षण 'अभिजनवादी शिक्षणाचेच विस्तारित रूप' असा त्याचा संकुचित अर्थ लावता येत नाही. याचे कारण असे की,(सार्वत्रिक शिक्षणाच्या माध्यमातून वेगवेगळ्या सामाजिक-आर्थिक, सांस्कृतिक पार्श्वभूमीची मुले शाळांमध्ये दाखल होतात. त्यांच्या गरजा बहुविध असतात. अभिजनवादी शाळांमध्ये येणाऱ्या मुलांच्या पार्श्वभूमीमध्ये मात्र फार विविधता नसते, त्यांची गरज व उद्दिष्ट एक असते, त्यामुळे आता स्थानिक परिस्थितीशी जुळवून घेता येण्याच्या दृष्टीने, सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणपद्धती लवचिक असली पाहिजे. यामध्ये स्थानिक ज्ञानव्यवस्थांशी संवाद साधत त्यांची सांगड शाळेतल्या आशयाशी घालणे अंतर्भूत आहे.) अशा संवादाविना मुलांसाठीचा अभ्यासक्रम निष्क्रिय, अमूर्त आणि त्यांच्या जगण्यापासून तुटलेला असाच होईल. स्थानिक ज्ञानव्यवस्थांच्या तुलनेत आपल्याच ज्ञानव्यवस्था शास्त्रीय आणि आधुनिक आहेत, असा दावा करून आपल्या ज्ञानव्यवस्थांनाच सार्वत्रिक आणि श्रेष्ठ समजणाऱ्या अभिजनवादी पद्धतीपेक्षा ही व्यवस्था निराळी आहे. हे एव्हाना माहीतच आहे की, खरी शास्त्रीयता संकुचित नसते. म्हणजेच शाळेत सध्या प्रचलित असलेली विज्ञानाची, शास्त्रीयतेची संकल्पनासुद्धा अभिजनवादीच आहे! दर्जेदार शिक्षणाच्या, या दुसऱ्या बाजूच्या अन्वयार्थाची तीन मार्गदर्शक तत्त्वे आहेत (NCF- 2005 च्या भूमिका स्पष्ट करणाऱ्या लेखामध्ये म्हटल्याप्रमाणे), जी इथे मांडणे उचित ठरेलः

अ. ज्ञानाची शाळेबाहेरच्या जीवनाशी सांगड घालणे.

ब. केवळ पाठ्यपुस्तककेंद्री न राहता, मुलांच्या सर्वांगीण विकासाला पोषक ठरेल अशा प्रकारचा समृद्ध अभ्यासक्रम तयार करणे.

क. विद्यार्थ्यांना कृतिशील व चिकित्सक बनवणारी पद्धती राबवणे.

प्र.16.सार्वजनिक प्राथमिक शिक्षणपद्धतीसंदर्भात लेखकास काय अपेक्षित आहे ?

अ) स्थानिक परिस्थितीशी सुसंगतता साधावयास हवी.

ब) आधुनिक दृष्टीकोन स्वीकारावयास हवा.

क) स्थानिक जनतेशी संवाद साधायला हवा.

ड) लोकज्ञानाची शाळेतल्या आशयास सांगड घालायला हवी.

1) अ, क, ब, ड 2) अ व ड 3) वरील सर्व अपेक्षित 4) अ व क

प्र.17.पुढील विधाने वाचा व लेखकास अपेक्षित असणाऱ्या शिक्षणपद्धतीपेक्षा अभिजनवादी शिक्षणपद्धती कशा प्रकारे वेगळी आहे ?

अ) अभिजनवादी शिक्षणप्रणालीत स्थानिक ज्ञान व्यवस्थांचा अंतर्भाव आहेच असे नाही.

ब) अभिजनवादी शिक्षणव्यवस्था समाजाच्या सामाजिक–आर्थिक पार्श्वभूमीस सामावून घेणारी आहे.

क) अभिजनवादी शिक्षण व्यवस्था खऱ्या अर्थाने शास्त्रीय आहे.

1) केवळ अ 2) अ व क 3) केवळ ब 4) वरील सर्व

प्र.18.पुढील विधाने वाचा व योग्य नसलेली विधाने ओळखा.

अ) लेखकास आजच्या गुरुकुल शिक्षणपद्धती ऐवजी पारंपरिक 'गुरुकुल परंपरा' असणारी शिक्षण पद्धती अपेक्षित आहे.

ब) अभिजनवादी शिक्षण व्यवस्था व सार्वजनिक प्राथमिक शिक्षण व्यवस्था यांमध्ये कोणताही गुणात्मक फरक निदान उताऱ्यात तरी आढळून येत नाही.

1) अ व ब दोन्ही 2) केवळ अ 3) केवळ ब 4) दोन्ही विधाने योग्य

प्र.19. 'त्या' दोन भूमिकांना लेखक अस्वीकृत करतो, कारण

1) लेखक खुले आर्थिक धोरण नामंजूर असणाऱ्यांपैकी आहे.

2) त्या दोन्ही भूमिका अभिजनवादी शिक्षण पद्धतीच्या वाहक आहेत.

3) त्या दोन्ही भूमिकांमुळे स्थानिक भाषांतील शिक्षणास वाव मिळत नाही.

4) वरील तीनही कारणे योग्य आहेत.

प्र.20.पुढील विधाने वाचा.

अ) अभिजनवादी शिक्षण व्यवस्था आणि सार्वत्रिक शिक्षण व्यवस्था यांत फरक आहे.

ब) अभिजनवादी शाळांमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी विविधांगी असते.

1) दोन्ही विधाने बरोबर व विधान अ हे ब ची कारणमीमांसा देते.

2) दोन्ही विधाने बरोबर; पण विधान अ हे ब ची कारणमीमांसा देत नाही.

3) अ बरोबर ब चूक

4) दोन्ही विधाने चूक असल्याने त्यांच्या अर्थार्थी काहीही संबंध नाही.